**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक २१७ । शनिवार २३ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322







# अपहृत तरुणाच्या सुटकेसाठी गेलेल्या पोलीस पथकावर टोळक्याचा हल्ला

## नगर तालुक्यातील उदरमल येथील घटना । दोन पोलीस जखमी, चारजणांना अटक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** चहाविक्रेत्याचे आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून अपहरण करणा–या टोळक्याच्या ताब्यातून सुटका करण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर जमावाने हल्ला केल्याची घटना नगर तालुक्यातील उदरमल येथे काल, दिनांक २२ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास घडली. या घटनेत दोन पोलीस जखमी झाले असून, या प्रकरणी चारजणांना अटक करण्यात आली आहे.

रामेश्वर प्रकाश पालवे (रा. कोल्हार, ता. जि. नगर), २. संतोष हिरामण कुटे (रा. सारसनगर, अहिल्यानगर), ज्ञानेश्वर प्रकाश पालवे (रा. कोल्हार, ता. जि. नगर) व. तेजस भरत जावळे (रा. कोल्हार, ता. जि. नगर) व इतर चार–पाच अनोळखी अशी आरोपींची नावे आहेत.

फिर्यादी आकाश विजय कार्ले (वय २७ वर्षे, धंदा शेती, रा. दहिगाव साकत खुर्द, ता. जि. नगर) याचे आरोपींनी आर्थिक व्यवहाराच्या कारणातून दिनांक २० मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास साकत खुर्द येथून पांढ–या रंगाच्या स्कार्पिओ जीपमधून (एमएच १६–एजे ६१७१) अपहरण केले.

आरोपींनी केलेल्या हल्ल्यात पोलीस खंडेराव संताजी शिंदे व विक्रांत विलास भालसिंग (नेमणूक नगर तालुका पोलीस ठाणे) जखमी झाले आहेत. या प्रकरणी

दोघा जखमी पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपींविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपी रामेश्वर पालवे, ज्ञानेश्वर पालवे, तेजस जावळे व इतर चार–पाच अनोळखी (सर्व रा. उदरमल ता. जि. नगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपहृत तरुणाच्या भावाने कळविल्यानुसार तरुणाच्या सुटकेसाठी पोलीस दिनांक २२ रोजी दुपारी अडीचच्या सुमारास उदरमल शिवारातील दोस्ती हॉटेलसमोर गेले असता संतोष कुटे, ज्ञानेश्वर पालवे, रामेश्वर पालवे, तेजस जावळे व त्याच्यासोबत असलेले चार ते पाचजण यांनी बेकायदेशीर जमाव करून पोलिसांना धक्काबुक्की करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच ज्ञानेश्वर पालवे व रामेश्वर पालवे यांनी पोलोसीस विक्रांत भालसिंग यांच्या खिशातील मोबाईल बळजबरीने काढून घेतला, असे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी चारजणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

### घटनेची थोडक्यात हकिकत

फिर्यादी आकाश कार्ले याचे अमृततुल्य नावाचे चहाचे दुकान असुन तेथे आरोपी हे चहा पिण्यासाठी येत असल्याने त्यांची ओळख झाली. आर्थिक अडचण असल्याचे फिर्यादीने रामेश्वर पालवेला सांगितल्यानंतर त्याने फिर्यादीस सत्तर हजार रुपये दिले. परंतु काही दिवसांनी तो साथीदारांसह येऊन तू मला दरमहा पाच हजार रुपये व्याज दे असे म्हणू लागला. फिर्यादीने नकार दिल्याचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादीच्या घरी जाऊन फिर्यादीस घराबाहेर बोलावले व आपल्याला बाहेर जायचे आहे, तू चारचाकीत बस असे म्हणून फिर्यादीस वाहनात बसवून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीने त्यांना तुम्ही मला मारहाण का करता अशी विचारणा केली असता त्यांनी व्याजाची तारीख होऊन गेली तरी तू उशिराने पैसे का टाकले. त्यामुळे तुला मुद्दल व व्याजासह ९० हजार रुपये लगेच द्यावे लागतील असे म्हणाले. माझ्याकडे इतके पैसे नाहीत असे म्हणाल्यावर फिर्यादीस शिवीगाळ करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली व त्याचा मोबाईल हिसकावून घेत कोल्हार गावाकडे दोस्ती नावाच्या हॉटेलवर नेऊन एका रूममध्ये डांबून ठेवले. त्यानंतर दुस–या दिवशी आरोपींनी फिर्यादीस सोडून फिर्यादीच्या भावास पैशाची मागणी केली. तो पैसे घेऊन येतो, असे म्हणाला असता स्यास वेळ लागल्याने त्यांनी पुन्हा फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादीचा भाऊ या ठिकाणी दोन गाड्या घेऊन आला. त्यावेळी त्यांना पोलीस आल्याची चाहूल लागल्याने राग आल्याने रामेश्वर पालवेने फिर्यादीस लाथ मारून तुझ्या भावाने गद्दारी केली असे म्हणत फिर्यादीचा भाऊ व त्याच्यासोबत आलेले मित्र तसेच पोलिसांवर हल्ला करुन मारहाण केली. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि वारुळे हे करीत आहेत.

# मॅनेजरसह तरुणाला बेदम मारहाण

## हॉटेल कर्मचाऱ्याला आसरा दिल्याचा राग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** केडगाव परिसरात एका हॉटेल कर्मचाऱ्याला रात्रीसाठी आश्रय दिल्याच्या कारणावरून हॉटेल मॅनेजर आणि संबंधित तरुणाला बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सुभाष सुकारामजी पांगा (वय ४१) हे केडगाव येथील अर्चना हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या ओळखीचा आलमगीर मंडल हा तरुण जवळील जय मल्हार हॉटेलमध्ये काम करत होता. मात्र, पगार न मिळाल्यामुळे त्याने नोकरी सोडली होती. गावाकडे जाण्यापूर्वी राहण्याची सोय नसल्याने तो २१ मे रोजी रात्री अर्चना हॉटेल येथे आला होता. मानवतेच्या भावनेतून सुभाष पांगा यांनी त्याला आपल्या खोलीत राहण्यास परवानगी दिली.

दरम्यान, २२ मे रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास जय मल्हार हॉटेलचा मालक विशाल बाळासाहेब राहींज हा संबंधित खोलीवर आला. दरवाजा ठोठावून आत प्रवेश केल्यानंतर त्याने ''तू त्याला इथे राहू कसा दिलास?'' असा जाब विचारत संताप व्यक्त केला. त्यानंतर आरोपीने सुभाष पांगा यांना अश्लील शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

त्यानंतर आरोपीने आलमगीर मंडल याला खोलीबाहेर ओढून आणत त्यालाही बेदम मारहाण केली. तसेच, ''पुन्हा इथे दिसलास तर हात–पाय तोडून टाकीन,'' अशी धमकी दिल्याचे समोर आले आहे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेनंतर घाबरलेल्या सुभाष पांगा यांनी मित्राच्या मदतीने कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली. पोलिसांनी विशाल बाळासाहेब राहींज (रा. वॉटर गल्ली, केडगाव, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध मारहाण, शिवीगाळ आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार लगड करत आहेत.

# जगन्नाथ बोठे पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** वाळकी, ता. जि. अहिल्यानगर येथील प्रगतीशील शेतकरी व भागवत धर्माचे प्रसारक जगन्नाथ दगडुजी बोठे पाटील (वय८७) यांचे आज शनिवार दि. २३.०५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वा. वृद्धापकाळाने निधन झाले.


ज्येष्ठ पत्रकार अॅड. डॉ. बाळासाहेब बोठेपाटील, वाळकी येथील यशदीप गॅस एजन्सीचे संचालक प्रा. अनुपम बोठेपाटील व वीरपत्नी इंद्रायणी भालसिंग यांचे ते वडील होत. कै. बोठे पाटील यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज शनिवारी सायंकाळी पाच वाजता वाळकी ( बोठे वस्ती, शिरकांडमळा) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# ड्रोनच्या साहाय्याने प्रभागाचा नकाशा तयार

## जनगणना कार्यात डॉ.अमोल बागुल यांचा अभिनव उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** गृह मंत्रालय,भारत सरकारच्यावतीने डिजिटल जनगणना उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात जनगणना पूर्वतयारीचे काम वेगाने सुरू असून, प्रगणक शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी आपल्या कार्यक्षेत्रात एक अभिनव आणि तंत्रज्ञानाधिष्ठित उपक्रम राबविला आहे.

स्वतःकडे जनगणनेसाठी आलेल्या घरयादी प्रभागाचा अचूक व अद्ययावत नकाशा तयार करण्यासाठी त्यांनी आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. ड्रोनच्या सहाय्याने संपूर्ण परिसराचे हवाई छायाचित्रण करून त्या आधारे प्रभागातील रस्ते, घरे, गल्ली, प्रमुख ठिकाणे व भौगोलिक रचना यांचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. या माहितीच्या आधारे जनगणना कार्यासाठी उपयुक्त असा सुस्पष्ट व अद्ययावत नकाशा तयार करण्यात आला.

पान ४ वर

# शब्दगंध साहित्य संमेलनामुळे नव्या पिढीत वाचन संस्कृती रुजणार– दत्ता मामा भरणे

## स्व. अरुणकाका साहित्य नगरी १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे जल्लोषात उद्घाटन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या ''स्व. अरुणकाका साहित्य नगरी''चे उद्घाटन आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण तथा कृषी मंत्री दत्तात्रय विठ्ठल उर्फ दत्ता मामा भरणे यांच्या हस्ते या साहित्य नगरीचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी आमदार संग्रामभैय्या जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, डॉ. पुरुषोत्तम भापकर, संपतदादा बारस्कर, कुमार वाकळे, गणेश भोसले, महेश लोंढे, प्रकाश भागानगरे, मोहित पंजाबी, प्रा. डॉ. संदीप सांगळे, डॉ. संजीवनीताई तडेगावकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शाहिरी जलसा कार्यक्रमाने संमेलनाला विशेष रंगत आणली. शाहीर कल्याण काळे, भारुड सम्राट हमीद सय्यद, शाहीर भारत गाडेकर, वसंत डंबाळे, डॉ. शेषराव पठाडे, प्रशांत सूर्यवंशी, दिगंबर गोंधळी आणि हौसीनाथ बोर्डे आदी कलाकारांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली.

स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी प्रस्ताविकातून संमेलनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री दत्ता मामा भरणे म्हणाले की, ''राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनामुळे नव्या पिढीत वाचनाची आवड निर्माण होणार आहे. 'वाचाल तर वाचाल' हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वाचनामुळे विचार समृद्ध होतात, चुकीच्या प्रवृत्तींपासून दूर राहता येते आणि जीवनाला सकारात्मक दिशा मिळते.''

ते पुढे म्हणाले, ''जीवनात घडण्यासाठी प्रत्येकाला कष्ट आणि चिकाटी आवश्यक असते. कोणाकडेही जादूची कांडी नसते. मी कृषी मंत्री झालो असलो तरी शेवटी शेतकऱ्याचाच मुलगा आहे. साहित्य संमेलन ही केवळ गर्दी नसून विचारवंतांची मेजवानी असते. येथे विचारांची देवाणघेवाण होते आणि समाजात वैचारिक संस्कार घडतात.''

या संमेलनात प्रा. डॉ. गणी पटेल आणि आयु. अशोकराव गायकवाड यांना ''शब्दगंध जीवनगौरव पुरस्कार कृषिमंत्री दत्ता भरणे पान ४ वर

# २५ मेपर्यंत प्रश्न न सोडवल्यास आयुक्तांसमोर तीव्र आंदोलन - आ. सत्यजित तांबे

## माध्यमिक शिक्षक संघाची शिक्षण आयुक्तांसोबत बैठक; शिक्षकांच्या प्रश्नांवर चर्चा
## पुणे येथे शिक्षण आयुक्तांसोबत शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या उपस्थितीत तसेच मा. आमदार सत्यजित तांबे, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर आणि शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांच्यासोबत पुणे येथे नुकतेच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस नाशिक विभागातील सर्व शिक्षणाधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

या बैठकीत महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या वतीने एस. डी. भिरुड, राज्य फेडरेशन संघाचे कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे, शिक्षक नेते तसेच चेअरमन आप्पासाहेब शिंदे, दिलीप काटे तसेच अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सेक्रेटरी अमोल ठाणगे व दिपक दरेकर यांनी सहभाग घेतला.

बैठकीमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये शिक्षकांचे रखडलेले वेतन, संच मान्यता, दप्तर दिरंगाई, शालार्थ मान्यता, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक मान्यता, डी.एड.–बी.एड. प्रमोशन मान्यता, अकरावी प्रवेश प्रक्रिया, समायोजन, शालार्थ आयडी तसेच विविध प्रशासकीय कामांमध्ये होणारी अडवणूक आदी महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता.

तसेच बैठकीमध्ये अंशतः अनुदानित शिक्षकांचे नियमित वेतन, शालार्थ आयडी प्रकरणे, संच मान्यतेतील त्रुटी, शिक्षक भरती प्रक्रियेतील

पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### राज्य सहकार आयुक्त अनिल कवडे यांच्याकडून डॉ. उद्धव शिंदे यांना श्री सिद्धिविनायक प्रतिमेची भेट



अहिल्यानगर- राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे यांनी स्नेहबंध सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांना सारसबाग येथील श्री सिद्धिविनायक गणेशाची प्रतिमा भेट दिली. यावेळी राज्य सहकारी आयुक्त कवडे म्हणाले की, सामाजिक कार्यासोबत अध्यात्मिक जडणघडण ही समाज उभारणीसाठी आवश्यक आहे. स्नेहबंध सोशल फाऊंडेशन समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सकारात्मक कार्य करीत असल्याचे समाधान वाटते, असेही त्यांनी सांगितले.

### अवघ्या ३२ दिवसांत कुरआन शरीफचे भाषांतर पूर्ण



अहिल्यानगर - ऑल इंडिया उलमा बोर्ड तर्फे मुंबई येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात मुफ्ती मोहम्मद शाकिर मतीउल्लाह खान यांना प्रतिष्ठेचा ''फखर-ए-हिंद'' पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातील येरवडा सेंट्रल जेल येथे अवघ्या ३२ दिवसांत संपूर्ण कुरआन शरीफचे भाषांतर लिहून त्यांनी ऐतिहासिक कार्य केले. त्यांच्या या उल्लेखनीय कुरआनी सेवेला गौरव देण्यासाठी हा विशेष सन्मान देण्यात आला.सुमारे १३ वर्षांपूर्वी मुफ्ती साहेबांवर काही निराधार आरोप करण्यात आले होते. त्या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान त्यांना येरवडा कारागृहात ठेवण्यात आले होते. मात्र, नंतर न्यायालयाने सर्व पुरावे आणि तथ्यांचा सखोल अभ्यास करून त्यांना निर्दोष मुक्त केले. सर्व आरोप खोटे आणि बनावट असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मुफ्ती साहेबांनी कठीण परिस्थितीतही संयम, धैर्य आणि चिकाटीचे उदाहरण घालून दिले. तुरुंगातील कालावधीत त्यांनी संपूर्ण कुरआन शरीफचे भाषांतर पूर्ण करून प्रेरणादायी इतिहास रचला. हा पुरस्कार मुंबईचे युवा आयकॉन तथा आमदार परिषद सदस्य जिशान बाबा सिद्दिकी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी माजी आमदार अतुल शाह, मुश्ताक नाखवा, माजी आमदार अण्णा, एनसीपी नेते मोईन कश्मीरी, सुहैल सुभेदार, नबील उझअमा, हाजी शहनवाज, राविश मोमीन, हाफिज यमीन बासर, अझहर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या भव्य सोहळ्यास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक आणि समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. पुरस्कार स्वीकारल्यानंतर मुफ्ती मोहम्मद शाकिर खान यांनी ऑल इंडिया उलमा बोर्ड चे नॅशनल जनरल सेक्रेटरी अंजर अनवर खान, मुंबई अध्यक्ष आरिफ बापू मेमन आणि संपूर्ण उलमा बोर्ड टीमचे मनः पूर्वक आभार मानले. याचवेळी त्यांच्या प्रसिद्ध ''तुफ्हा-ए-जिंदाँ'' या पुस्तकाची प्रत लवकरच बाजारात उपलब्ध होणार असल्याची घोषणा करण्यात आली.

# दत्तात्रयांच्या जयघोषाने देवगडनगरी दुमदुमली

## जगात कसे जगावे हे भगवद्गीता, तर कसे मरावे हे भागवत शिकवते भास्करगिरीजी महाराज यांचे प्रतिपादन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा–** भागवत कथा ही पूर्वपुण्याईशिवाय ऐकायला मिळत नाही. जगात कसे जगावे हे आपल्याला भगवद्गीता शिकवते, तर कसे मरावे हे भागवत शिकवते. या कथेमुळे जन्म-मरणाचे साकडे सुटते. त्यामुळे सर्व भाविकांनी या पर्वकाळात कथेचे श्रवण करून आंतरिक आनंद मिळवावा, असे श्रीक्षेत्र देवगड दत्त पीठाचे प्रमुख महंत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांनी भाविकांना मार्गदर्शन करताना सांगितले.

त्रैवार्षिक पुरुषोत्तम मासाच्या पवित्र पर्वावर, नेवासे तालुक्यातील भूलोकीचा स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गुरुदेव दत्तपीठ क्षेत्र देवगड येथे श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञाचा सोहळा सुरू झाला आहे. राजस्थान (जोधपूर) येथील संत गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून होणाऱ्या या कथा सोहळ्याचा प्रारंभ गुरुवारी भागवत ग्रंथ शोभायात्रा आणि गोमाता पूजनाने करण्यात आला. यावेळी टाळ-मृदंगाचा गजर आणि भगवान दत्तात्रयांच्या नामघोषाने संपूर्ण देवगडनगरी दुमदुमून गेली होती. पुरुषोत्तम मासानिमित्त आयोजित या विशेष श्रीमद भागवत कथा व कीर्तन सोहळ्याला ''विठ्ठल भक्तीरस महोत्सव'' असे नाव देण्यात आले आहे. देवगड येथील मुख्य प्रांगणातून वारकरी संप्रदायाच्या पारंपारिक थाटात शोभायात्रेला सुरुवात झाली.

या मिरवणुकीत गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज, देवगड दत्त पीठाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज, आणि त्यांचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्यासह वारकरी संप्रदायातील अनेक संत-महंत, कीर्तनकार, प्रवचनकार आणि हजारो महिला-पुरुष भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शोभायात्रा सुरू असतानाच, देवगडच्या गोशाळेत जाऊन गोमातेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर पवित्र प्रवरा-गंगा पात्रात जाऊन मान्यवर संतांच्या हस्ते गंगेचे विधीवत पूजन पार पडले. याप्रसंगी भगवान दत्तात्रय आणि श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या समाधी मंदिरात जाऊन मूर्तींचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ज्ञानसागर सभामंडपात या भव्य शोभायात्रेचा समारोप झाला. येथे गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते भागवत ग्रंथाचे आणि श्री राधाकृष्णजी महाराज यांचे संतपूजन करण्यात आले.

भास्करगिरीजी महाराज म्हणाले, पुरुषोत्तम मासाच्या या पवित्र काळात श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा आणि भगवान दत्तात्रयांच्या कृपा आशीर्वादाने आपल्याला पुन्हा एकदा गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या वाणीतून भागवत श्रवणाची सुवर्णसंधी मिळाली आहे. राधा हे भक्तीचे तर कृष्ण हे ज्ञानाचे प्रतीक आहे.

पुरातन काळातील कुटीया ठरतेय मुख्य आकर्षण कथेच्या शुभारंभ प्रसंगी व्यासपीठाची केलेली सजावट वैशिष्ट्यपूर्ण आहे. शेणाने सारवलेले मॅट, त्यावर काढलेल्या आकर्षक रांगोळ्या, पुरातन काळातील कंदील, तांबे-पितळाचे हंडे आणि चटईची कुटीया या पारंपरिक पद्धतीने मुख्य कथा व्यासपीठ सजवण्यात आले आहे. तसेच कथेच्या पार्श्वभूमीवर पंढरीच्या पांडुरंगाने संतांना खांद्यावर घेतल्याची प्रतिमा लक्ष वेधून घेत आहे.

# भारतीय संस्कृतीचा नॉर्वेमध्ये जागर!

## पंतप्रधान मोदींसमोर संगमनेरच्या रेश्मा नेहे यांचे शास्त्रीय नृत्य सादरीकरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**संगमनेर–** नॉर्वे देशामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर भारतीय शास्त्रीय नृत्यकला सादर करण्याचा बहुमान संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ येथील रेश्मा नेहे यांना मिळाला. हा क्षण अत्यंत गौरवास्पद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पाच देशांच्या परदेश दौऱ्यावर असून, या दौऱ्यात त्यांनी नॉर्वे देशालाही भेट दिली. राजधानी ओस्लो येथे त्यांना नॉर्वे देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान ''ग्रँड क्रॉस ऑफ द रॉयल नॉर्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट'' प्रदान करण्यात आला. यावेळी भारतीय सांस्कृतिक परंपरेनुसार त्यांचे स्वागत करण्यात आले.

या स्वागत सोहळ्यात नॉर्वेमध्ये भारतीय संगीत व नृत्य प्रशिक्षण वर्ग चालविणाऱ्या सौ. रेश्मा नेहे यांच्या चमूला विशेष संधी मिळाली. सांस्कृतिक कार्यक्रमात रेश्मा नेहे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भरतनाट्यम, कुचिपूडी, ओडिसी, कथक आणि मोहिनीअट्टम या भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांचे सादरीकरण केले. भारतीय संस्कृती, परंपरा आणि कलावैभवाने सजलेल्या या विशेष कार्यक्रमामुळे पंतप्रधान मोदी अतिशय प्रसन्न व मंत्रमुग्ध झाले.

रेश्मा नेहे या सावरगाव तळ (ता. संगमनेर) येथील साहेबराव गेनूभाऊ नेहे पाटील यांच्या पत्नी असून त्यांचे माहेर निमज येथील आहे. त्या शांताराम खंडेराव गुंजाळ यांच्या कन्या आहेत. साहेबराव नेहे हे नॉर्वेची राजधानी ओस्लो येथे एका बहुराष्ट्रीय कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत.



रेश्मा नेहे यांनी भारतीय शास्त्रीय नृत्य व संगीताचे उच्च शिक्षण विशेष प्राविण्यासह पूर्ण केले असून त्या सध्या नॉर्वेमध्ये भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी शास्त्रीय संगीत व नृत्य संवर्धनाचे कार्य करत आहेत. त्या तेथे ''कला नृत्य अकॅडमी''च्या माध्यमातून भरतनाट्यम, ओडिसी, कथक, कुचिपूडी आणि मोहिनीअट्टम आदी शास्त्रीय नृत्यप्रकारांचे प्रशिक्षण देत आहेत.

**मोदींसमोर कला सादर करण्याचा अभिमान**

''भारतीय सांस्कृतिक कला ही जागतिक कीर्तीचे नेते आणि आपल्या देशाचे मानबिंदू नरेंद्रजी मोदी यांच्यासमोर विदेशात सादर करण्याचे भाग्य लाभले. मोदीजींनी या कलेचे कौतुक केले, हे माझ्यासाठी अत्यंत गौरवास्पद आहे.''

रेश्मा नेहे, नॉर्वे

**सावरगाव तळच्या शिरपेचात मानाचा तुरा**

''आमच्या गावातील महिलेने जगातील लोकप्रिय नेते आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विदेशात संसदेच्या विशेष सभागृहात स्वागत करण्याचा, त्यांना भेटण्याचा आणि भारतीय संस्कृती सादर करण्याचा बहुमान मिळवला, ही आमच्या गावासाठी अभिमानाची बाब आहे.''

**गोरक्ष नेहे पाटील,**

कामगार पोलीस पाटील, सावरगाव तळ

# हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीच्या कार्तिक करांडेची महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा–** जिल्ह्यातील हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीचा प्रतिभावान क्रिकेटपटू कार्तिक वैभव करांडे याची (डिफरंटली एबल्ड क्रिकेट कौन्सिल ऑफ इंडिया) आयोजित पाचव्या एलिट फिजिकल डिसेब्लिटी २० चॅम्पियनशीप २०२६ साठी महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड झाली आहे. कार्तिकच्या या निवडीमुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

बंगळुरू येथे १७ मे ते २७ मे या कालावधीत होणाऱ्या डीसीसीआयच्या खुल्या वयोगटातील मुलांच्या प्रतिष्ठेच्या २० क्रिकेट स्पर्धेत कार्तिक महाराष्ट्र राज्य डिसेब्लिटी क्रिकेट संघाचे तो प्रतिनिधित्व करणार आहे. देशभरातील विविध राज्यांतील गुणवंत खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असल्याने ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अशा दर्जेदार स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात स्थान मिळवणे हे कार्तिकच्या मेहनतीचे व गुणवत्तेचे मोठे यश आहे.



कार्तिक हा उजव्या हाताचा आक्रमक फलंदाज असून डावखुरा फिरकी गोलंदाज म्हणूनही त्याने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. मैदानावरील त्याचा आत्मविश्वास, सातत्यपूर्ण सराव आणि संघासाठी खेळण्याची जिद्द यामुळे त्याने अल्पावधीतच प्रशिक्षक आणि निवड समितीचे लक्ष वेधून घेतले. यापूर्वीही त्याने १४ व १६ वर्षांखालील मुलांच्या महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघटनेच्या आमंत्रित क्रिकेट स्पर्धेत विजय क्लब, पुणे संघाचे प्रतिनिधित्व करून उल्लेखनीय कामगिरी बजावली होती.


नियमित सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि खेळावरील निष्ठा यामुळे त्याने प्रगती साधली आहे. तो सध्या अहिल्यानगर येथील हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये प्रशिक्षक सरफराज बांगडीवाला यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. कार्तिकच्या या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप, हुंडेकरी स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक वसीम हुंडेकरी यांच्यासह क्रीडा प्रेमींनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# बोल्हेगाव फाटा येथे 'माऊली बाईक होलसेलर' दालनाचा शुभारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जुन्या मोटरसायकल खरेदी-विक्री क्षेत्रातील प्रसिद्ध 'माऊली बाईक होलसेलर' या दालनाची नवीन शाखा बोल्हेगाव फाटा येथे मोठ्या उत्साहात सुरू करण्यात आली. जुन्या दुचाकींचा मोठा स्टॉक, विविध कंपन्यांच्या गाड्या आणि सुलभ कर्ज सुविधा यामुळे या दालनाकडे ग्राहकांचे आकर्षण वाढत आहे.

या दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप आणि आमदार अक्षय कर्डिले यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी नगरसेवक कुमारसिंग वाकळे, प्रशांत वारे, आकाश कातोरे, बाबुशेठ नागरगोजे, राजेश कातोरे, संपत दादा बारस्कर, संतोषजी शिंदे, करण गायकर, शिवा तेलंग आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सोमनाथ बेरड, दत्तात्रय बेरड, गणेश जाधव, संतोष मोकाटे, शुभम खुळे, अमोल आत्रे, अभय धूस, अरुण भोर, पप्पू वाकळे आदी उपस्थित होते.



सोशल मीडियावर लोकप्रिय असलेले माऊली बाईकचे संचालक दिनेश जाधव यांनी सांगितले की, ''अहिल्यानगरमधील ही आमची सातवी शाखा असून ग्राहकांसाठी प्रत्येक प्रकारची लोन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अवघ्या पाच ते दहा हजार रुपयांच्या डाउन पेमेंटवर विविध दुचाकी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. ग्राहकांना विश्वासार्ह सेवा, दर्जेदार गाड्या आणि सुलभ व्यवहार देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ''युवकांनी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीसोबत व्यवसाय क्षेत्राकडेही वळले पाहिजे. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर व्यवसायामध्ये मोठे यश मिळवता येते. माऊली बाईकने जुन्या गाड्यांच्या विक्री क्षेत्रात ग्राहकांचा विश्वास संपादन केला असून हे दालनही ग्राहकांच्या पसंतीस उतरेल.

ते पुढे म्हणाले की, ''स्थानिक पातळीवर नवीन व्यवसाय सुरू झाल्यास रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि शहराच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळते. युवकांनी आधुनिक व्यवसाय संकल्पना स्वीकारून स्वतःच्या पायावर उभे राहणे गरजेचे आहे.

# पोस्टल संघटनेच्या कार्याध्यक्षपदी संतोष यादव यांची फेरनिवड

## नागपूरचे धनंजय राऊत सर्कल सचिव,महादेव गोपाळघरे खजिनदारपदी । रायते कल्याण येथे २७ वे राज्य अधिवेशन उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–**नॅशनल असोसिएशन ऑफ पोस्टल एम्प्लॉईज ग्रुप 'सी' महाराष्ट्र व गोवा सर्कलचे २७ वे द्विवार्षिक अधिवेशन दि. २० ते २२ मे दरम्यान रायते (ता. कल्याण) येथील आदित्य ॲग्रो फार्म अँड रिसॉर्ट येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या अधिवेशनात अहिल्यानगर कॅम्प पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर व पोस्टल संघटनेचे नेते संतोष यादव यांची महाराष्ट्र सर्कलच्या कार्याध्यक्षपदी बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. तसेच जामखेड तालुक्यातील रहिवासी व मुंबई नॉर्थ ईस्ट विभागात कार्यरत असणारे महादेव गोपाळघरे यांची खजिनदारपदी निवड झाली.

अधिवेशनाचे उद्घाटन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील झुंजारराव (दिल्ली), सेक्रेटरी जनरल शिवाजी वासू रेड्डी (दिल्ली), जनरल सेक्रेटरी निसार मुजावर (दिल्ली) तसेच संतोष लाड (मुंबई) यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. राज्यभरातील सुमारे चाळीस विभागांतील दीडशेहून अधिक प्रतिनिधींनी अधिवेशनात सहभाग घेतला होता

प्रतिनिधी सत्रात महाराष्ट्र व गोवा राज्यातील विविध विभागांतील प्रतिनिधींनी आपल्या विभागातील प्रश्न, कर्मचारी हिताशी संबंधित विषय मांडले. डाक विभागाची सद्यस्थिती, नवीन सॉफ्टवेअर प्रणाली,आठवा वेतन आयोग, तसेच दिल्लीस्तरीय संघटनात्मक घडामोडी यावर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी राष्ट्रीय नेते निसार मुजावर, सुनील झुंजारराव आणि शिवाजी वासू रेड्डी यांनी मार्गदर्शन करताना कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संघटना कटिबद्ध असल्याचे सांगितले. येणाऱ्या आठव्या वेतन आयोगाच्या पार्श्वभूमीवर संघटनेने आयोगाच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले असून त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याची माहितीही त्यांनी दिली.



अधिवेशनात पुढील दोन वर्षांसाठी राज्य कार्यकारिणीची निवड करण्यात आली. कार्यकारिणी पुढीलप्रमाणे

अध्यक्ष आशुतोष देशपांडे (नाशिक), कार्याध्यक्ष संतोष यादव (अहिल्यानगर), उपाध्यक्ष शिवाजी नवले (बीड), सर्कल सचिव धनंजय राऊत (नागपूर) तसेच खजिनदार महादेव गोपाळघरे (मुंबई नॉर्थ ईस्ट),

उपसचिव योगेश समडोलीकर (कोल्हापूर) सहायक मंडळ सचिव श्रीमती शुभदा घाग (मुंबई ईस्ट), चंद्रकांत चांदरे (पुणे वेस्ट), रवी भोसले (संभाजीनगर), कालूराम पारखी (पुणे ईस्ट), सूर्यकांत गुट्टे (लातूर), धनंजय इंगोले (नवी मुंबई), शंतून सोनार (मालेगाव) व एफ. आर. तडवी (भुसावळ), सहायक खजिनदार सुनील गोवर (गोवा) तर ऑडिटर म्हणून लखन वैष्णव (संभाजीनगर) यांची निवड झाली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा अधिवेशनस्थळी सत्कार करण्यात आला. अधिवेशनात कमलेश मिरगणे, रावसाहेब चौधरी (अहिल्यानगर), प्रकाश कदम, संतोष रायकर (बारामती), राजेंद्र विश्वास, शैलेश शिलवंत, पांडुरंग खेडकर (श्रीरामपूर), आर. एच. गुप्ता, हरी घुले (मुंबई), धनंजय शेंडगे, किरण सावंत (बीड), शिवाजी तोंडले, उदय बंडगर (पंढरपूर), अनिल थोरात (सोलापूर), गणेश ठाकूर (धुळे), मन्मथ राऊत, मिलिंद निपाणकर (नागपूर), सोपान महाडिक (रायगड), सदा नाईक (नवी मुंबई), चेतन आपेट (नाशिक) यांचे सह राज्यभरातील चाळीस विभागातील दिडशे प्रतिनिधी उपस्थित होते.

अधिवेशनाचे प्रमुख संयोजक संतोष कदम (ठाणे) यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण टीमने प्रतिनिधींसाठी उत्कृष्ट व्यवस्था केली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष कदम यांनी केले. सूत्रसंचालन रुपेश नगरकर यांनी तर आभार प्रदर्शन संदीप सैदानी यांनी केले.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)


## दै. आकर्षण निवडक

### पेट्रोल-डिझेल टंचाईवर मात करण्यासाठी रेल्वे हाच प्रभावी पर्याय - स्वाती सिरसुल



अहिल्यानगर - देशात निर्माण होत असलेल्या पेट्रोल-डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर तसेच पंतप्रधानांनी इंधन बचतीबाबत केलेल्या आवाहनाचा संदर्भ देत अहिल्यानगर ते पुणे इंटरसिटी रेल्वे सेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्त्या सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदन रेल्वेमंत्री, रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना पाठवून त्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष वेधले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगरपुणे इंटरसिटी रेल्वेची मागणी सातत्याने होत असून विविध सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी यासाठी अनेकदा पाठपुरावा केला आहे. वृत्तपत्रांनी देखील या प्रश्नाला व्यापक प्रसिद्धी दिली; मात्र अद्याप प्रत्यक्ष रेल्वे सेवा सुरू झालेली नसल्याने नगरकरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सौ. सिरसुल यांनी सांगितले की, त्या स्वतः २०२२ पासून या मागणीसाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. गेल्या वर्षी काही कार्यकर्त्यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले होते, मात्र त्यानंतरही रेल्वे बोर्डाकडून अपेक्षित कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. रेल्वे विभागाने मागील काही वर्षांत नगरच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामे केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. मनमाड ते दौंड या १८४ किलोमीटर अंतरावरील सिंगल लाईनचे डबल लाईनमध्ये रूपांतर करण्यासाठी सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे, भूसंपादन, विद्युतिकरण, चाचण्या आदी अनेक महत्त्वाच्या प्रक्रिया रेल्वे प्रशासनाने यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. रेल्वे अधिक सुरक्षित आणि वेगवान करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेले योगदान मोलाचे असून त्यांचे कौतुक झाले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. नगरआष्टी रेल्वेला अपेक्षित प्रतिसाद नसतानाही ती सेवा सुरू ठेवण्यात येत असल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी प्रशासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अनेक नागरिकांनी या मार्गावरील रेल्वेमुळे आर्थिक तोटा होत असल्याचे मत व्यक्त केले असतानाही ती सुरू ठेवली जाते; मात्र परळी ते पुणे किंवा मुंबईपर्यंत रेल्वे सुरू केल्यास मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रतिसाद मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले. इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील अलीकडील युद्धपरिस्थितीमुळे जागतिक स्तरावर इंधन संकटाची परिस्थिती निर्माण झाली असून पेट्रोल-डिझेलचे दर सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. देशातील अनेक भागांत इंधन टंचाईची समस्या निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी नागरिकांना वाहनांचा वापर आवश्यक असेल तेव्हाच करण्याचे आवाहन केले आहे. या संदर्भात बोलताना सौ. सिरसुल म्हणाल्या की, अहिल्यानगरहून पुण्याकडे दररोज हजारो प्रवासी खासगी वाहन, बस आणि इतर साधनांद्वारे प्रवास करतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेलचा वापर होत असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होत आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी अहिल्यानगरपुणे इंटरसिटी रेल्वे हा सर्वात परिणामकारक आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो.

### हिराबाई कपिले यांचे निधन



अहिल्यानगर - केडगाव येथील रहिवासी श्रीमती हिराबाई उत्तमराव कपिले यांचे आज दि. २३ मे २०२६ रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८१ वर्षांचे होत्या. त्यांच्यावर केडगावमधील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. 'समाचारचे संजय कपिले यांच्या त्या आई होत. श्रीमती हिराबाई कपिले यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पिंपळगाव उज्जैनी तलाव खोलीकरणाला वेग; आमदार अक्षय कर्डिले यांनी केली पाहणी

**जलयुक्त शिवार योजनेमुळे राज्यातील अनेक दुष्काळग्रस्त भागांना मोठा दिलासा मिळाला**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील पिंपळगाव उज्जैनी येथील ससेवाडी रोडवरील गाव तलावाच्या खोलीकरण व गाळ उपसा कामाला वेग आला असून या कामाची पाहणी आमदार अक्षय कर्डिले यांनी केली. लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कामातून तब्बल ५ हजार ब्रास गाळ अल्पभूधारक शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला जाणार आहे. गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रयत्नातून या कामासाठी १७.५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. अनेक दिवसांपासून रखडलेल्या या कामाला आता प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांना सूचना देताना आमदार अक्षयकर्डिले म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील जलयुक्त शिवार योजनेमुळे राज्यातील अनेक दुष्काळग्रस्त भागांना मोठा दिलासा मिळाला आहे. नद्या, तलाव, धरणे आणि बंधाऱ्यांचे खोलीकरण व गाळ उपसा केल्यामुळे अतिरिक्त पाणीसाठा निर्माण झाला असून अनेक गावे दुष्काळमुक्त होण्यास मदत झाली आहे. तलावातील गाळ शेतात टाकल्याने जमिनीची सुपीकता वाढते. त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. आवश्यक असल्यास जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून अतिरिक्त निधी मिळवण्यासाठीही प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी मतदारसंघ विकासासाठी पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. यावेळी बाजार समितीचे माजी संचालक जगन्नाथ मगर, सरपंच अरुण आढाव, चेअरमन सुभाष आढाव, भगवान आढाव, भाऊसाहेब वाघ, गोरख वाघ, नाथा चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पतसंस्थेच्या वाटचालीत प्रिती बोगावत यांचे महत्वपूर्ण योगदान - चेअरमन अभय पितळे

**जैन ओसवाल पतसंस्थेच्या संचालिका प्रिती बोगावत यांना भावपूर्ण श्रद्धांजली**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या विद्यमान संचालिका सौ. प्रिती प्रतिक बोगावत यांचे नुकतेच आकस्मिक निधन झाले. त्यांना पतसंस्थेच्या सभागृहात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी चेअरमन अभय पितळे, व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी , विनित बोरा, अ‍ॅड. आनंद फिरोदिया, शरद गोयल, ज्येष्ठ तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, माजी चेअरमन शैलेश मुनोत (बबलू), प्रतिक बोगावत, नितीन सोनी, नितीन मुनोत प्रमोद डागा, प्रणिल बोगावत, प्रणव बोगावत, भिंगारचे शैलेश मुनोत, मनोज मुनोत व कर्मचारी उपस्थित होते.

चेअरमन अभय पितळे म्हणाले, जैन ओसवाल पतसंस्थेच्या वाटचालीत महिला संचालकांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. प्रिती बोगावत यांचे आकस्मिक निधन धक्कादायक आहे. संचालकपदी काम करताना त्यांनी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी नेहमीच मौलिक सूचना केल्या. महिला सभासदांसाठी चांगल्या योजना राबविण्यासाठी त्या आग्रही असायच्या. सहकाराचा त्यांनी अल्पावधीतच चांगला अभ्यास केला होता. पतसंस्थेच्या कामकाजात त्यांची उणीव नेहमीच जाणवत राहील. बोगावत परिवाराला परमेश्वर या दुःखातून सावरण्याची शक्ती प्रदान करो.

यावेळी संतोष गांधी, शैलेश गांधी, शैलेश मुनोत यांनीही बोगावत यांच्या आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली अर्पण केली.

# तहसील प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा ठिय्या आंदोलन

**शेतजमिनीच्या रस्त्याचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याची मागणी; लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मौजे टाकळी खादगाव, ता. अहिल्यानगर येथील सौ. सविता संजय पादीर व त्यांचे सासरे देवराम पादीर यांच्या मालकीच्या शेतजमिनीकडे जाणारा पारंपरिक रस्ता काही व्यक्तींनी बेकायदेशीररित्या अडवल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणात तहसील प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात संबंधित कुटुंबाने अखेर अहिल्यानगर तहसील कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले होते.

शेती हा उपजीविकेचा मुख्य आधार असताना शेतात जाण्यासाठीचा रस्ता बंद झाल्याने संबंधित कुटुंबाला मानसिक, आर्थिक व सामाजिक त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या संदर्भात सविता संजय पादीर यांनी जून २०२४ मध्ये अहिल्यानगर तहसील कार्यालयात लेखी तक्रार अर्ज दाखल करून रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली होती. मात्र, दीर्घ कालावधी उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यानंतर दिनांक २७ मे २०२५ रोजी राज्याच्या महसूल मंत्र्यांकडेही लेखी तक्रार सादर



करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत तब्बल सात महिन्यांनी, दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी नायब तहसीलदार गौरव दळवी यांनी टाकळी खादगाव येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली होती. त्यावेळी ''दोन ते चार दिवसांत प्रश्न मार्गी लावण्यात येईल,'' असे आश्वासन देण्यात आले होते.

मात्र, त्यानंतरही जवळपास पाच महिने उलटून गेले असून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे संबंधित कुटुंबाचे म्हणणे आहे. तहसील कार्यालयाच्या वारंवार चकरा मारूनही केवळ उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याने संतप्त झालेल्या कुटुंबाने सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश मोहन पोटे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले.

या सौ. सविता पादीर, संजय पादीर व अन्य कार्यकर्ते सहभागी झाले होते. ''जोपर्यंत शेतरस्त्याचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही,'' असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला होता.

दरम्यान, निवासी नायब तहसीलदार यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. प्रशासनाच्या पत्रात संबंधित प्रकरणी स्थळ निरीक्षण पंचनामा करण्यात आल्याचे तसेच वादी व प्रतिवादी यांची सुनावणी घेण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. जनगणना कामकाजामुळे निर्णयास विलंब झाल्याचे स्पष्ट करत, दिनांक २५ मे २०२६ पर्यंत नियमोचित व गुणवत्तेवर आधारित निर्णय देण्याची दक्षता घेण्यात येणार असल्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे.या संपूर्ण प्रकरणामुळे तहसील प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, सामान्य शेतकरी कुटुंबाला न्याय मिळवण्यासाठी दोन–दोन वर्षे शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# गॅस टंचाईच्या निषेधार्थ पुरवठा विभागात ठिय्या आंदोलन

**छावा संघटनेचा आक्रमक पवित्रा; गॅस एजन्सीचा परवाना रद्द करण्याची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरात निर्माण झालेल्या कृत्रिम गॅस टंचाईच्या विरोधात छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गुरुवारी तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनामुळे काही काळ तहसील कार्यालयातील कामकाजावर परिणाम झाला.

शहरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून गॅस सिलिंडर मिळण्यात अडचणी येत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. संत एकनाथ गॅस एजन्सीकडून ग्राहकांची गैरसोय होत असून मनमानी कारभार सुरू असल्याचे सांगत संबंधित एजन्सीचा परवाना रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुरवठा अधिकारी कैलास बहुरे यांची भेट घेऊन निवेदन दिले. तसेच इंडियन डिझाइनचे सेल्स ऑफिसर उमेश चौधरी यांच्याकडेही कारवाईसंदर्भात पत्र पाठविण्यात आल्याची माहिती देण्यात आली. गॅस वितरण व्यवस्थेत अनियमितता होत असल्याचा आरोप करत बनावट ग्राहक, होम डिलिव्हरीतील तफावत तसेच आर्थिक गैरव्यवहारांची चौकशी करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. दरम्यान, प्रशासनाकडून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# अल करम हॉस्पिटलच्या वतीने रविवारी रक्तदान शिबीराचे आयोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजात रक्ताची गरज दिवसेंदिवस वाढत असून अनेक रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक उद्देशाने ईदुल अजहा निमित्त अल करम हॉस्पिटलच्या वतीने रविवारी २४ मे २०२६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सायंकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत अल करम हॉस्पिटल किंग्सगेट रोड, इंगळे मेडिकलजवळ आयोजित करण्यात आले आहे.

''रक्तदान करा, जीवन वाचवा'' हा संदेश देत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. एका छोट्या कृतीतून एखाद्याच्या आयुष्यात नवी आशा निर्माण होऊ शकते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच नवीन रक्तपेशी तयार होण्यास प्रोत्साहन मिळते, हृदयाचे आरोग्य सुधारते, कॅलरीज बर्न होतात आणि मानसिक समाधान मिळते, असेही आयोजकांनी सांगितले. याशिबिरात सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी ९९२१९९१४९२, ९५९५९७८६००, ९०२८२८९९०८ आणि ८९७५७३९२१२ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उजाड जमिनीला मिळणार नवजीवन; 'रेन गेन बॅटरी'मधून २१व्या शतकाची सदाहरित क्रांतीचा संकल्प

**जैवविविधता नेगेन्ट्रॉपी मोहिमेतून महाराष्ट्रातील दोन लाख हेक्टर जमीन हिरवीगार करण्याचा निर्धार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रातील दोन लाखांहून अधिक हेक्टर उजाड, कोरडी आणि निर्जीव झालेली जमीन पुन्हा हिरवीगार करण्यासाठी ''जैवविविधता नेगेन्ट्रॉपी हरित क्रांती'' राबविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने मांडण्यात आला आहे. स्थानिक लोकविज्ञान, नैसर्गिक साधने आणि पावसाच्या पाण्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन यांच्या माध्यमातून ही क्रांती उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या मोहिमेमुळे फळांनी लगडलेली झाडे, पक्ष्यांचा किलबिलाट, फुलपाखरांचे नृत्य आणि समृद्ध परिसंस्था पुन्हा निर्माण होऊ शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



महाराष्ट्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असला तरी त्यातील बहुतांश पाणी वाहून जाते किंवा उन्हामुळे बाष्पीभवन होते. परिणामी जमिनीत पुरेशा प्रमाणात पाणी मुरत नाही आणि ओलाशय टिकत नाही. यामुळे जमीन कोरडी पडते, शेतीची उत्पादकता घटते, विहिरी कोरड्या होतात आणि जैवविविधतेचा ऱ्हास होतो. अनेक भागांत जमीन मृत प्रदेशासारखी दिसू लागल्याने पर्यावरणासह शेतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून ''रेन गेन बॅटरी'', ''बारमाही भूमिगत ओलाशय'' आणि ''जैवविविधतेवर आधारित वृक्षसंवर्धन'' ''निगेन्ट्रापी ''या तीन संकल्पना पुढे आणण्यात आल्या आहेत. प्रत्येक झाडाजवळ जमिनीखाली पावसाचे पाणी साठवून ठेवणारी विशेष नैसर्गिक रचना तयार करण्याची कल्पना मांडण्यात आली आहे. दगड, वाळू, झाडं मुरूम, आणि इतर नैसर्गिक घटकांचा वापर करून तयार होणाऱ्या या व्यवस्थेला ''भूमिगत पावसाची बॅटरी'' असे संबोधण्यात आले आहे.

पाऊस पडताच हे पाणी थेट जमिनीत साठवले जाते. त्यामुळे पाणी वाहून जात नाही किंवा उन्हामुळे वाफ बनून उडून जात नाही. हे पाणी हळूहळू जमिनीत मुरत राहते आणि झाडांच्या मुळांना बाराही महिने आवश्यक ओलावा पुरवते. एका पावसाळ्यात साठवलेले पाणी संपूर्ण वर्षभर झाडांना जगण्याची ओल पुरवठा देऊ शकते, असा दावा या मोहिमेच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

पूर्वी पावसाचे मोठे प्रमाण वाया जात असल्याने जमिनीत ओलावा टिकत नव्हता. त्यामुळे झाडांची वाढ खुंटत होती आणि शेतकऱ्याला स्थिर उत्पन्न मिळत नव्हते. मात्र ''रेन गेन बॅटरी'' पद्धतीमुळे पाणी मोठ्या प्रमाणावर जमिनीत मुरेल, भूमिगत ओलावा टिकून राहील आणि झाडांच्या जगण्याची क्षमता वाढेल. यामुळे फळझाडे, औषधी वनस्पती, सावली देणारी वृक्षराजी आणि जैवविविधतेला पोषक परिसंस्था निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या हरित मोहिमेमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अनेक स्रोतांमधून वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. फळबागांमधून वर्षभर उत्पन्न मिळू शकेल. मधमाशांच्या पालनातून शुद्ध मध उत्पादन होईल. गांडूळखतातून सेंद्रिय खत तयार करून त्याची विक्री करता येईल. औषधी वनस्पतींच्या लागवडीमधूनही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन निर्माण होणार आहे. विशेष म्हणजे यासाठी मोठे कालवे, महागडी यंत्रणा, रासायनिक खते किंवा प्रचंड भांडवलाची आवश्यकता भासणार नाही. निसर्गालाच शेतकऱ्याचा भागीदार बनविणारी ही संकल्पना असल्याचे मत पीपल्स हेल्पलाईनचे अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केले.


या मोहिमेसाठी अ‍ॅड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, अ‍ॅड. अमित थोरात, शाहीर कान्हु सुंबे, अ‍ॅड. लक्ष्मणराव पोकळे, वीर बहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, अ‍ॅड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी कार्यकर्ते प्रयत्नशील असून राज्यभर ही संकल्पना पोहोचविण्यासाठी जनजागृती मोहिमाही राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# ‘संवादभूषण’ मध्ये अहिल्यानगरचे वृतछायाचित्रकार अनिल शाह

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांमध्ये,वृतपत्र क्षेत्रात कार्यरत प्रेरणादायी अश्या व्यक्तिमत्त्वांची दखल घेऊन त्यांच्या आजपर्यंन्तच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारे, स्फुर्तिदायक असे ‘संवादभूषण’ हे पुस्तक राज्याचे निवृत्त माहिती संचालक व न्युज स्टोरी टुडे या जागति पातळीवरील पोर्टलचे निर्माते देवेंद्र भुजबळ यांनी नुकतेच प्रकाशित केले आहे. या पुस्तकात ३४ प्रेरणादायी व्यक्तीमत्वांचा समावेश असुन या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण आणि इतर मान्यवरांच्या हस्ते नुकतेच लोणावळा येथे संपन्न झाले.

या पुस्तकात अहिल्यानगर येथील ज्येष्ठ वृतछायाचित्रकार अनिल विनोद शाह यांचाही आजपर्यंन्तच्या वृत छायाचित्रण क्षेत्रातील कार्याचा समावेश झाला असून अहिल्या नगरवासियांनसाठी ही अभिमानास्पद बाब आहे. शाह परिवार गेल्या चार पिढ्या नपासुन




छायाचित्रण क्षेत्रात कार्यरत आहे. त्यामुळे अनिल शाह यांच्यावरील लेखात आजोबा गुलाबचंदजी, वडील विनोद शाह,भाऊ प्रमोद,दिपक उदय व सुनिल व आता काही भावाची मुले या छायाचित्रण क्षेत्रात कार्यरत आहेत चार पिढ्यांचे या. पुस्तकात नगर जिल्हय़ाच्या जडणघडणीत असलेले योगदान देखील अधोरेखित करण्यात आले आहे. शहा परिवाराने आपल्या छायाचित्रण तसेच वृत छायाचित्रण क्षेत्रातील आपल्या वाटचालीतून स्वतः ची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ती अनिल आजही जपत आहे

केवळ नगर जिल्ह्यातीलच नाही तर महाराष्ट्र राज्यातील ज्येष्ठ व अनुभवी वृतछायाचित्रकारत त्यांची गणना अभिमानाने केली जाते. नगर जिल्ह्यातील प्रत्येक क्षेत्रातील संस्कृतिक, धार्मिक,शैक्षणिक, सामाजिक,विविध राजकारण परिस्थितींचा, विकासात्मक संस्थांचा,औद्योगिकरणच्या प्रगती पथावरील वाटचालीचे ते साक्षीदार असुन विशेष प्रसंगातील जुन्या काही छायाचित्रांचा खजिना आज शहा परिवाराकडे आहे.निसर्ग चित्रणासह विविध कलात्मक,समयोसुचित, प्रसंगानुरूप, प्रभावी, परिणामकारक छायाचित्र टिपण्याच्या विशेष शैलीची दखल घेत अनिल शाह यांना राज्य, राष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रतिष्ठित पुरस्कार देऊन आजपर्यंन्त गौरविण्यात आले आहे.

या सर्वांची नोंद ज्येष्ठ लेखक देवेंद्र भुजबळ यांनी आपल्या लेखात घेतली आहे.

# विश्वकल्याणासाठी अहिल्यानगरात ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग

**वेदघोष, मंत्रोच्चार आणि भक्तिमय वातावरणात पूर्णाहुती; हजारो भाविकांची उपस्थिती**
**अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या उपक्रमाने अधिक मासात निर्माण झाला अध्यात्मिक उत्साह**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जगभरात निर्माण झालेल्या अस्थिरता, संकटे आणि नकारात्मकतेचे निवारण होऊन विश्वात शांतता, समृद्धी आणि मंगलमय वातावरण निर्माण व्हावे या उदात्त हेतूने चितळे रोड येथील ऋग्वेद भवनात अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागाची अत्यंत भक्तिमय वातावरणात पूर्णाहुती करून सांगता करण्यात आली. अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघ संचलित महर्षी वेद विद्यालयाच्या वतीने आयोजित या वैदिक सोहळ्याने संपूर्ण परिसर अध्यात्मिक उर्जेने भारावून गेला होता.

यागाच्या कालावधीत दररोज पहाटेपासून वेदघोष, मंत्रोच्चार, हवन, पूजन आणि विविध वैदिक विधींनी ऋग्वेद भवन परिसरात भक्तिरसाचा दरवळ निर्माण केला होता. वैदिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष राजकुमार जोशी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली या धार्मिक सोहळ्याची सुरुवात झाली. यजमान प्रसाद कडेकर व अशोक कुलकर्णी सपत्नीक यांच्या शुभहस्ते अग्नी प्रदीपन करून भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागास प्रारंभ करण्यात आला.

यानंतर प्रायश्चित्त विधी, श्रीगणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, योगिनी मंडल पूजन, वर्धिनी कलश पूजन, भैरव मंडल, रुद्र मंडल तसेच नवग्रह पूजन यांसारखे विविध वैदिक विधी अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने पार



पडले. वेदमंत्रांच्या निनादाने परिसर दुमदुमून गेला होता.

यजमान चंद्रचूड गोंगले, अशोक कुलकर्णी, राजेंद्र भणगे, ॲड. शिरीष गटणे , अनिलकुमार जोशी,निनाद देव यांच्या हस्ते ऋग्वेद हवन, स्थापित देवता हवन, बलिदान, पूर्णाहुती व महाआरती करण्यात आली. विशेष म्हणजे दररोज पाच यजमानांच्या हस्ते ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग संपन्न होत होता. या धार्मिक विधीमध्ये सहभागी होण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

या प्रसंगी संघाचे अध्यक्ष किशोर जोशी, मयूर जोशी, अमोल कापरे, प्रसाद कुलकर्णी, सागर गोवर्धन, अवधूत भणगे, श्रीकांत जोशी, ओम जोशी, गणेश भालेराव , प्रदिप जोशी घनपाठी प्रतिकजी मुळे, आनंद जोशी यांच्यासह ब्रह्मवृंद व अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत वातावरण अधिक भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाले होते.

पूर्णाहुतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजकुमार जोशी यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच बन्सीमहाराज मिठाईचे संचालक राजकुमार जोशी परिवाराच्या वतीने दररोज अन्नदानाची सेवा करण्यात आली. या सेवाकार्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले.

# केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या बास्केटबॉल लीगला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। १४ वर्षाखालील मुला–मुलींनी दाखवली दमदार खेळी**
**। ऊर्जा गुरुकुल स्कूलमध्ये रंगली स्पर्धा**




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आयोजित १४ वर्षाखालील मुला–मुलींची बास्केटबॉल लीग स्पर्धा ऊर्जा गुरुकुल स्कूल, केडगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशिक्षक श्री. छबुराव कोतकर आणि सौ. स्वाती बाराहाते यांच्या नियोजनातून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, चपळ हालचाली आणि क्रीडाभावनेचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली.

या स्पर्धेसाठी सचिन अग्रवाल, ओमसिंग बायस,मार्शल सर, हर्षल शेलोत, ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका सौ. कल्याणी फिरोदिया, ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे श्री. प्रसाद जमदाडे, प्रसाद आंधळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना अकॅडमीचे प्रशिक्षक छबुराव कोतकर म्हणाले की, ‘‘शहरी भागातील मुला–मुलींमध्ये बास्केटबॉलसारख्या खेळाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे. खेळाडूंचा उत्साह आणि पालकांचा प्रतिसाद पाहता भविष्यात आणखी मोठ्या स्तरावर स्पर्धा आयोजित करण्याची प्रेरणा मिळाली आहे.’’

स्पर्धेदरम्यान पालकांनीही अकॅडमीच्या उपक्रमाचे कौतुक करत अशा क्रीडा स्पर्धा सातत्याने व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सहकारी, प्रशिक्षक आणि स्वयंसेवकांचे केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आभार मानण्यात आले.

# कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची आमदार संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

**बोगस बियाणे विक्रेत्यांवर कडक कारवाई; लायसन्स रद्द करणार – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत शहर विकासकामांचा आढावा घेतला. सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती त्यांनी यावेळी जाणून घेतली. यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले, नगरसेवक प्रकाश भागानगरे आदी उपस्थित होते.

पत्रकारांशी संवाद साधताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यामध्ये बोगस बी–बियाणे विकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून संबंधित दुकानदारांचे लायसन्स रद्द करण्यात येतील. शेतकऱ्यांची फसवणूक कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

कांद्याच्या दरातील घसरणीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, कांद्याचे दर कमी झाल्याची वस्तुस्थिती आहे. याबाबत पणनमंत्री जयकुमार रावल विविध उपाययोजना करत असून राज्य सरकारने कांदा खरेदी सुरू केली आहे.

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पूर्वीपेक्षा २० ते ३० टक्क्यांनी इंधन खरेदी वाढल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली असून ३० जूनपर्यंत याबाबतचा अंतिम निर्णय होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कर्जमाफीसंदर्भातील अहवाल राज्य सरकारकडे सादर झाला असून लवकरच दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी केली जाईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.

# आर्किटेक्चरच्या (वास्तुकला) २०२६ प्रवेशासाठी शेवटची संधी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देशभरातील वास्तुकला महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर २०२६ परीक्षेची प्रक्रिया एप्रिल २०२६ सुरु झालेली आहे . कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर न्यू दिल्ली द्वारे आयोजित केली जाणारी ही परीक्षा बी.आर्च या पाच वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी अनिवार्य आहे.

वास्तुकला क्षेत्रातील करिअरसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी वाळूंज येथील रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर हे नामांकित आणि प्रतिष्ठित महाविद्यालय आहे. जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या महाविद्यालयातून दर्जेदार आर्किटेक्ट घडत आहेत.

नाटा २०२६ ची नोंदणी प्रक्रिया एप्रिल २०२६ मध्येच सुरू झाली असून याची नोंदणी २०२६ या अधिकृत वेबसाईट वर विद्यार्थ्यांनी करावी, पहिल्या फेजच्या परीक्षा सुरु झाल्या असून त्या १३ जुन २०२६ पर्यंतच्या प्रत्येक शुक्रवारी दुपारच्या सत्रांत आणि प्रत्येक शनिवारी दोन सत्रांत घेतली जाणार आहे . पहिल्या फेज मधे एक विद्यार्थी जास्तीत जास्त दोन वेळा ही परीक्षा देऊ शकतो. परीक्षेची दुसरी फेज ७ व ८ ऑगस्ट २०२६ रोजी असून जे विद्यार्थी पहिल्या फेज ला बसू शकले नाही त्यांनाच हि परीक्षा एकदाच देता येऊ शकणार आहे परंतु या विद्यार्थांना ॲडमिशन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रिक्त (–)असलेल्या जागांसाठीच प्रवेश घेता येऊ शकेल अशी माहिती कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर च्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आलेली आहे . विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या अधिक माहितीसाठी https://nata.in या वेबसाईटला भेट द्या.

प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ॲडमिशन सेलशी ( ) ८६०५०५३०२५ / ९८६०४९५४९४ क्रमांकावर संपर्क साधावा.

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा बालरंगभूमी पुरस्कार डॉ. सुधा कांकरिया यांना जाहीर



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद या १०० वर्षांपेक्षा जास्त काळ कलाक्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित संस्थेकडून बालरंगभूमी क्षेत्रात उल्लेखनीय व विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा मानाचा पुरस्कार यंदा अहिल्यानगर ज्येष्ठ साहित्यिक, समाजसेविका व रंगकर्मी डॉ. सुधा कांकरिया यांना जाहीर करण्यात आला. दरवर्षी १४ जून रोजी नाट्य क्षेत्रातील विविध मान्यवरांना ही पुरस्कार दिले जातात.

राज्यस्तरीय कांकरिया करंडक बाल एकांकिका स्पर्धा या माध्यमातून मुलांमध्ये संस्कार, सर्जनशीलता, कलात्मकता आणि सामाजिक भान रुजविण्यासाठी डॉ. सुधा कांकरिया यांनी २५ वर्षे केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी असून, त्यांच्या या योगदानाचा गौरव म्हणून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे अशी माहिती नाट्यपरिषद मध्यवर्तीचे अध्यक्ष श्री प्रशांत दामले यांनी दिली. त्यांच्या कार्यामुळे बाल कलाकारांना नवे आयाम लाभले असून अनेक बालकलाकारांना योग्य व्यासपीठ मिळाले आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अहिल्यानगर उपनगर शाखा यांच्यावतीने डॉ. सुधा कांकरिया यांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता आणि त्याला मध्यवर्ती शाखेने तत्काळ मान्यता दिली आणि हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ. प्रकाश कांकरिया अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अहिल्यानगर उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर, श्री अमोल खोले, कार्याध्यक्ष .. कुलकर्णी, सहकोषाध्यक्ष शिरीष जोशी, उपाध्यक्ष प्रशांत जठार , शैलेश देशमुख, सौ. स्नेहा रानडे, जयंत येलुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी डॉ. सुधा कांकरिया यांना पुढील वाटचालीसाठी परिषदेच्या वतीने शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कला, साहित्य आणि संस्कार यांच्या सुंदर संगमातून समाज घडविणाऱ्या अशा व्यक्तिमत्त्वाचा सन्मान होणे ही संपूर्ण रंगभूमीसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त करण्यात आली.

(पान १ वरून)

## ड्रोनच्या साहाय्याने प्रभागाचा नकाशा तयार

याप्रसंगी आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांनी नमूद केले की’’या उपक्रमामुळे घरांची अचूक ओळख, क्षेत्रनिहाय नियोजन, घरभेटींची सुलभता आणि जनगणना प्रक्रियेतील अचूकता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनगणना कार्य अधिक प्रभावी करण्याचा हा प्रयत्न इतर प्रगणकांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.’’

यावेळी,सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, प्रभाग अधिकारी बाळासाहेब पवार, मास्टर ट्रेनर डॉ.संतोष देशमुख, रफिक देशमुख, पर्यवेक्षक अलका दहातोंडे व प्रगणक आदी उपस्थित होते.

याविषयी बोलताना डॉ. बागुल यांनी सांगितले की, ‘‘जनगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास हे कार्य अधिक अचूक, सुलभ आणि परिणामकारक होऊ शकते. त्याच उद्देशाने ड्रोनच्या सहाय्याने नकाशा तयार करण्याचा हा प्रयत्न केला.’’ अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील या नाविन्यपूर्ण उपक्रमाची नागरिकांसह शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातही चर्चा होत असून, डिजिटल भारताच्या दिशेने हे एक प्रभावी पाऊल मानले जात आहे.

## २५ मेपर्यंत प्रश्न न सोडवल्यास आयुक्तांसमोर तीव्र आंदोलन - आ. सत्यजित तांबे

अडचणी, रोस्टर तपासणी, समायोजन, टीईटी अट, डीसीपीएस प्रकरणे, पर्यवेक्षक व मुख्याध्यापक मान्यता, टप्पा अनुदान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, प्राथमिक व माध्यमिक विभागातील प्रलंबित विषय, अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पवित्र पोर्टलमधील तांत्रिक त्रुटी तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील शिक्षकांच्या प्रश्नांवरही सकारात्मक चर्चा करण्यात आली. संघटनेने शिक्षण विभागासमोर विविध मागण्यांचे निवेदन सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाकडे विविध प्रलंबित विषय तत्काळ मार्गी लावण्याची मागणी केली. शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्नांमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात अडचणीत असल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. यावेळी शिक्षण आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांनी प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. मात्र, प्रलंबित प्रश्नांचे तातडीने निराकरण न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या वतीने देण्यात आला.

## शब्दगंध साहित्य संमेलनामुळे नव्या पिढीत वाचन संस्कृती रुजणार– दत्ता मामा भरणे

यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

संमेलनादरम्यान विविध विषयांवरील परिसंवाद, काव्य संमेलन, गझल मैफल, चर्चासत्रे तसेच पुस्तक प्रकाशनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. ‘‘आधुनिक साहित्यातील स्त्री जीवनाचे चित्रण’’, ‘‘बदलते ग्रामीण जीवन आणि ग्रामसंस्कृती’’ तसेच ‘‘असा मी घडलो...’’ यांसारख्या विषयांवर मान्यवर साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत. रविवारी होणाऱ्या समारोप कार्यक्रमास पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण उपस्थित राहणार असून, विविध साहित्य पुरस्कारांचे वितरण आणि ‘‘शब्दसंचित’’ ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. साहित्यिक, कवी, लेखक आणि साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे, शब्दगंधचे संस्थापक सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे आणि संयोजन समितीच्या सदस्यांनी केले आहे.